28 SEP 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लॉरेन्स अँड मेयो कंपनीचा शिवाजी विद्यापीठासमवेत सामंजस्य करार

❑ **सायबर सिक्युरिटी, ड्रोन तंत्रज्ञान, आधुनिक डिजिटल ऑप्टिकल तंत्रज्ञानासाठी सहकार्यवृद्धी होणार**



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ऑप्टिक्सच्या क्षेत्रातील आघाडीच्या सुप्रसिद्ध लॉरेन्स अँड मेयो प्रा. लि. (मुंबई) या कंपनीसमवेत शिवाजी विद्यापीठाने सामंजस्य करार केला आहे. सायबर सिक्युरिटी, ड्रोन तंत्रज्ञान आणि तत्सम आधुनिक डिजिटल ऑप्टिकल तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने सहकार्यवृद्धीसाठी करार करण्यात आला आहे.

विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सामंजस्य करारावर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि कंपनीतर्फे समूह संचालक (विपणन) डॉ. विवेक मेंडोंसा यांनी सह्या केल्या.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, लॉरेन्स अँड मेयो ही केवळ कंपनी नसून, एक सर्वंकष व्यवस्था म्हणून उदयास आली आहे. ऑप्टिक्सच्या क्षेत्रात अनेक गतिमान बदल होत आहेत. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण विद्यार्थ्यांपर्यंत त्याचे ज्ञान आणि लाभ पोहोचवणे आवश्यक बनले आहे.

डॉ. विवेक मेंडोंसा म्हणाले, गेल्या १४६ वर्षांत कंपनीने जगभरात विश्वासार्हता प्राप्त केली आहे. ऑप्टोमेट्रीमधील शिक्षण देशात सुरू करण्यामध्येही कंपनीने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. वैद्यकीय संस्थांसाठी अत्याधुनिक क्रिटिकल व ॲनालिटिकल साधने निर्माण केली आहेत. विविध शैक्षणिक संस्थांसमवेत औद्योगिक प्रशिक्षणाबाबत करार केले आहेत. स्टार्ट-अप सुरू करण्यासाठी कंपनी विद्यार्थ्यांना सातत्याने प्रोत्साहन देत आली आहे. शिवाजी विद्यापीठासमवेत करारान्वयेही विद्यार्थ्यांना अत्याधुनिक अभ्यासक्रम, विशेष कोर्सेस, नवसाधनांचा परिचय करून देऊन उद्योगास पूरक मनुष्यबळ निर्माण करण्यास प्राधान्य देण्यात येईल.

डॉ. महादेव देशमुख यांनी प्रास्ताविक केले, डॉ. प्रकाश राऊत यांनी आभार मानले. या वेळी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. एस. एन. सपली, डॉ. एस. डी. डेळेकर, डॉ. कविता ओझा, श्रीधर करंदीकर, लॉरेन्स अँड मेयो कंपनीचे पिल्लई, लिअँडर आणि गिरीधर आदी उपस्थित होते.

**उद्योगकेंद्री विद्यार्थी घडविण्याच्या दृष्टीने उपयुक्त करार**

विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हा सामंजस्य करार महत्त्वाचा आहे. लॉरेन्स अँड मेयो या कंपनीच्या अनुभवाचा लाभ घेऊन विद्यापीठात उद्योगकेंद्री युवक निर्माण होतील. त्यादृष्टीने विद्यापीठ सर्वतोपरी सहकार्य करेल, असे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

Times of India

# SUK signs MoU for enhanced tech support

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University Kolhapur (SUK) has signed a Memorandum of Understanding (MoU) with optical & eyewear retailer Lawrence & Mayo Pvt. Ltd, Mumbai, on Tuesday to enhance cooperation in cyber security, drone technology and advanced digital optical technologies.

Pro Vice-Chancellor of SUK, Dr Pramod Patil, and SUK Registrar, Dr V. N. Shinde, along with group director (marketing) Vivek Mendonsa signed the MoU. Under the agreement, students will be prioritised to create complementary manpower for the optics industry by introducing advanced and special courses, and new tools.

Pro Vice-Chancellor Dr. Patil said "It has become necessary to impart this knowledge to rural students studying with the university. The MoU will fulfill the need for education, training and technology and create a pool of trained youth."

Dr. Vivek Mendonsa told **TOI**, "The company has been consistently encouraging students to develop start-ups."

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात आयबीपीएस परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र व बार्टी यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार आयबीपीएस प्रवेश परीक्षेसाठी शिवाजी विद्यापीठ केंद्रामार्फत ९३ विद्यार्थी बसले आहेत. या विद्यार्थ्यांची परीक्षा मानव्यशास्त्र इमारतीमध्ये रविवारी सकाळी ११.०० ते १२.३० या कालावधीमध्ये पार पडणार आहे, असे केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी सांगितले.

सकाळ

# विद्यापीठात रविवारी 'आयबीपीएस' परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र आणि पुणे येथील बार्टी यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला आहे. या करारानुसार 'आयबीपीएस' प्रवेश परीक्षेसाठी विद्यापीठ केंद्रामार्फत ९३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. या विद्यार्थ्यांची परीक्षा मानव्यशास्त्र इमारतीमध्ये रविवारी (ता.१) सकाळी अकरा ते दुपारी साडेबारा या कालावधीमध्ये होणार आहे, अशी माहिती केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली.

तरुण भारत

# विद्यापीठात आयबीपीएस परीक्षा रविवारी

कोल्हापूर : सन २०२३-२४ या कालावधीकरिता डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र, शिवाजी विद्यापीठ व पुण्यातील बार्टी यांच्यात झालेल्या सामंजस्य करारानुसार आयबीपीएस प्रवेश परीक्षेसाठी शिवाजी विद्यापीठ केंद्रामार्फत ९३ विद्यार्थ्यांनी अर्ज भरला आहे. ही रविवार १ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते १२.३० या वेळेत शिवाजी विद्यापीठातील परीक्षा मानव्यशास्त्र इमारतीमध्ये होणार आहे. तरी विद्यार्थ्यांनी वेळेत परीक्षेला हजर राहावे, असे आवाहन केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.